# प्रकरण तिसरे

## ठेवी व गुंतवणूक

# प्रकरण तिसरे

## ठेवी

### प्रस्तावना:

सहकारी संस्थेच्या दृष्टीने ठेवी हा एक महत्त्वाचा भांडवल उभारणीचा मार्ग आहे. सभासदांकडून ठेवी गोळा केल्यास त्यांना काटकसरीची तसेच बचतीची सवय लागते. त्यांचा अनुत्पादक खर्च कमी होतो. सहकारी संस्थांनी ठेवीरुपाने जास्तीत जास्त भांडवल उभारण्याचा प्रयत्न करावा. कारण बँक कर्जापेक्षा, ठेवी रुपाने उभे केलेले भांडवल स्वस्त असते. संस्था व सभासद दोघांच्याही दृष्टीने हा मार्ग हिताचा आहे. संस्थेला स्वस्त भांडवल मिळते व सभासदांना व्याज मिळते. अर्थात या भांडवलाचा उपयोग वाढते उत्पन्न देणाऱ्या व्यवहारासाठी करणेत आला पाहिजे. म्हणजे व्याज व ठेवी परत करताना संस्थेला फारशा अडचणी येणार नाहीत.

बँक व्यवसाया व्यतिरिक्त इतर वित्तीय सहकारी संस्था केवळ मुदतीच्या ठेवी स्विकारतात. मात्र सहकारी पतसंस्था बचत ठेवी, मुदत बंद ठेवी व कायम ठेवी स्वीकारु शकतात. सभासदांकडून स्वीकारलेल्या ठेवींचा समावेश अंतर्गत भांडवलात तर बिगर सभासदांकडून स्विकारलेल्या ठेवींचा समावेश कर्जाऊ भांडवलात केला जातो. सभासदांना या ठेवीवर निश्चित व आकर्षक व्याजाचा दर दिला जातो. ठेवींच्या मुदतीअखेर त्या स्विकारलेल्या शर्तीनुसार सभासदांना परत केल्या जातात.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या ठेवी:

या संस्थेमार्फत बचत ठेवी व्यतिरिक्त मासिक ठेव, कायम ठेव व मुदत बंद ठेवी सभासदांकडून स्वीकारल्या जातात. तसेच बिगर सभासदांकडून फक्त मुदत बंद ठेवी स्वीकारल्या जातात. संस्था सर्व प्रकारच्या ठेवींवर १२ टक्के दराने व्याज देते. संस्था एकूण जमा होणा-या ठेवींच्या आधारे मोठया प्रमाणावर कर्ज पुरवठा करते. संस्थेने बाहेरुन कर्ज स्विकारुन सभासदांना कर्ज पुरवठा करण्यापेक्षा ठेवींमध्ये वाढ करुन कर्जे दिल्यास ते संस्थेस फायदेशीर ठरते. कारण बाहेरील कर्जापेक्षा ठेवींवर कमी व्याज द्यावे लागते.

या संस्थेस जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून १३ ते १३.५ टक्के दराने कर्ज मिळते तर सभासद ठेवींवर फक्त १२ टक्के व्याज द्यावे लागते. त्यामुळे मोठया प्रमाणात ठेवी जमा करणे फायदेशीर असते.

३:२ मासिक ठेव:

सभासदांची बचत प्रवृत्ती वाढविण्यासाठी मासिक ठेवी जमा केल्या जातात. संस्था सभासदांकडून मासिक वेतनातून दरमहा कमीत कमी रु.२०.०० मासिक ठेव जमा करुन घेते आणि वर्ष अखेरीस मासिक ठेवीची व्याजासह रक्कम सभासदांना परत केली जाते. संस्था मासिक ठेवीवर १२ टक्के व्याज देते.

संस्थेला मासिक ठेवीपासून किती रक्कम मिळेल याचा अंदाज असल्याने संस्था त्याप्रमाणात कर्जपुरवठा करु शकते. त्यामुळे संस्थेस मासिक ठेव परत करते वेळी अडचणी उद्‌भवत नाही.

संस्थेच्या मासिक ठेवीत झालेली वाढ पुढील कोष्टकावरुन दिसून येते --

कोष्टक क्र. ३:१

मासिक ठेवीतील वाढ

| अ.नं. | वर्षे (३०जून) | मासिक ठेव (रु.) | मासिक ठेवीतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | -- |
| २) | १९७०-७१ | १५,४८०.०० | -- |
| ३) | १९७१-७२ | १७,१७१.१७ | १०.९२ |
| ४) | १९७२-७३ | १९,८७६.०० | १५.७५ |
| ५) | १९७३-७४ | २२,११०.०० | ११.२४ |
| ६) | १९७४-७५ | २६,७८५.२४ | २१.१४ |
| ७) | १९७५-७६ | २९,२८०.९३ | ९.३२ |
| ८) | १९७६-७७ | ३१.६७०.९३ | ८.१६ |
| ९) | १९७७-७८ | ३४,२०७.६० | ८.०० |
| १०) | १९७८-७९ | ३६,८०७.६० | ७.६० |
| ११) | १९७९-८० | ४०,७१७.६० | १०.६२ |
| १२) | १९८०-८१ | ६२,८५७.६० | ५४.३७ |
| १३) | १९८१-८२ | १,०६,७२६.६० | ६९.७९ |
| १४) | १९८२-८३ | १,१६,७०६.६० | ९.३५ |
| १५) | १९८३-८४ | १,४५,७६६.६० | २४.९० |
| १६) | १९८४-८५ | २,०९,११६.६० | ३७.९७ |
| १७) | १९८५-८६ | २,७४,६३६.६० | ३६.५६ |
| १८) | १९८६-८७ | ३,२४,१७६.६० | १८.०४ |
| १९) | १९८७-८८ | ३,७७,४३९.०० | १६.४३ |
| २०) | १९८८-८९ | ४,५०,६८०.०० | १९.४० |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७०-७१ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कोष्टक क्र. ३:१ वरून असे दिसून येते की, सन १९७०-७१ साली मासिक ठेव रुपये १५,४८०.०० होती. यामध्ये वाढ होऊन १९७३-७४ साली मासिक ठेव रुपये २२,११०.०० पर्यंत झाली ही वाढ ४२.८३ टक्क्याची आहे. सन १९७४-७५ ते सन १९७८-७९ या पाच वर्षांच्या कालावधीत मासिक ठेवी फक्त ३७.४२ टक्क्यांनी वाढल्या. परंतु पुढील पाच वर्षांमध्ये मासिक ठेवी २५७.९९ टक्क्यापर्यंत वाढल्या. कारण सन १९८०-८१ साली सभासदांनी आपल्या मासिक ठेवी रु. १० ते रुपये १०० पर्यंत वाढविल्या होत्या. परिणामी याकालात मासिक ठेवी वाढल्याचे दिसते. आणि सन १९८४-८५ ते सन १९८८-८९ या काळात मासिक ठेव १२४.०९ टक्क्यांनी वाढली आहे.

संस्थेच्या मासिक ठेवीतील सर्वात कमी वाढ ही सन १९७८-७९ झाली आहे. ही वाढ फक्त ७.६० टक्के झाली आहे. कारण सभासद मासिक ठेव कमी प्रमाणात जमा करीत होते. परंतु सन १९८०-८१ पासून सभासदांनी रुपये १० च्या पटीत मासिक ठेवीत वाढ करून रु. १० ते रु. १०० पर्यंत मासिक ठेवी जमा केल्याने सन १९८१-८२ साली मासिक ठेवीतील वाढ सर्वाधिक म्हणजे ६१.७९ टक्के झाली असल्याचे दिसून येते.

१९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षांच्या कालावधीत मासिक ठेवीतील वाढ ही २८११.३७ टक्के झाली. आहे. मात्र याच कालावधीतील वार्षिक सरासरी मासिक ठेव वाढ ही फक्त २०.५० टक्के झाली आहे.

यावरून असे दिसून येते की, संस्थेच्या मासिक ठेवी मोठया प्रमाणावर वाढत असून, त्यांच्या आधारे संस्था कर्जपुरवठा वाढवू शकते.

३:३ कायम ठेव व मुदत बंद ठेव:

संस्थेच्या कायम ठेवीमध्ये सभासद कायम ठेव व सभासद मासिक वर्गणी यांचा समावेश होतो. संस्था सभासदांकडून मासिक वेतनातून दरमहा कमीत कमी रुपये १० मासिक वर्गणी जमा करुन घेते. या जमा होणाऱ्या मासिक वर्गणीचे वर्षअखेरीस कायम ठेवीत रुपांतर केले जाते. कायम ठेव सभासदांचे सभासदत्त्व रद्द झाल्यावरच परत केली जाते. परंतु दरवर्षी वर्षअखेरीस वर्गणीवरील व्याज सभासदांना देण्यात येते.

संस्थेच्या नियमानुसार ज्या सभासदांची शेअर मर्यादा रु. ५०००.०० पूर्ण झाली आहे. अशा सभासदांकडून कर्ज देतेवेळी मंजूर झालेल्या कर्जाच्या १० टक्के प्रमाणे शेअर्स पोटी रक्कम न कापता ती रक्कम "बिनपरतीची ठेव" (कायम ठेव) म्हणून कापून घेण्यात येते व ती रक्कम सभासदांच्या निवृत्तीनंतर सभासदांना परत केली जाते. हा बदल करण्याचे मुख्य कारण म्हणजे संस्थेचे भांडवल वाढविणे व सभासदांना जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करणे.

विशिष्ट मुदतीपर्यंत परत न मागता येणाऱ्या ठेवींना मुदती ठेवी असे म्हणतात. संस्थेमार्फत मुदत बंद ठेवी या एक वर्षमुदतीसाठी स्वीकारल्या जातात. तसेच सहा महिन्याहून कमी नाहीत अशा मुदतीच्या ठेवीही सभासदांकडून, सभासदांच्या पत्नी/पती/सज्ञान मुले/मुली, निवृत्त सभासद व शिवाजी विद्यापीठाच्या सेवेत हंगामी/रोजंदारी असलेले सेवक व इतर संस्था यांच्याकडून "ब" वर्ग सभासद सदराखाली स्वीकारल्या जातात. या ठेवीवरील व्याजदर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या व्याज दरास अनुसरुन राहील. अशी तरतूद सन १९८६-८७ साली उपविधीत करण्यात आली.

संस्थेच्या कायम ठेवी व मुदत बंद ठेवीतील वाढ पुढील कोष्टकामध्ये दर्शविली आहे.

## कोष्टक क्र. ३:२

### कायम ठेव व मुदत बंद ठेव यामधील वाढ

(रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष(३०जून) | कायम ठेव | मुदतबंद ठेव | कायम ठेवीतील वार्षिक वाढ(%) | मुदत बंद ठेवीतील वार्षिक वाढ(%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९८५-८६ | ७५,९९५.०० | १५,१००.०० | -- | -- |
| २) | १९८६-८७ | ३,६३,८२५.०० | ५१,४७०.०० | ३७८.७५ | २४०.८६ |
| ३) | १९८७-८८ | ५,७६,४३०.०० | १,४२,०००.०० | ५८.४४ | १७५.८९ |
| ४) | १९८८-८९ | ९,४३,४००.०० | ३,८१,८२०.०० | ६३.६६ | १६८.८९ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९८५-८६ ते सन १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९८५-८६ पूर्वी सभासद मासिक वर्गणी ही शेअर्समध्ये जमा केली जात होती परंतु सभासद शेअर्स मर्यादा (रु. ५०००.००) पूर्ण होत आल्याने १९८५-८६ साली नवीन कायम ठेव खाते सुरु करुन मासिक वर्गणी त्यामध्ये वर्ग करण्यात आली त्याचप्रमाणे मुदतबंद ठेव खाते सन १९८५-८६ मध्ये सुरु करण्यात आले.

कोष्टक क्र. ३:२ वरुन असे दिसून येते की, सन १९८६-८७ मध्ये कायम ठेवीतील वाढ सर्वाधिक म्हणजे ३७८.७५ टक्के आहे. कारण यावर्षी संस्थेने ज्या सभासदांची शेअर्स मर्यादा रु. ५०००.०० पूर्ण झाली आहे त्यांच्याकडून कर्ज देते वेळी १० टक्के प्रमाणे शेअर्स पोटी रक्कम न कापून घेता ती रक्कम कायम ठेव म्हणून जमा केली होती. त्यामुळे सन १९८६-८७ साली कायम ठेवीत वाढ झाली आहे. परंतु सन १९८७-८८ साली कायम ठेवीतील वाढ फक्त ५८.४४ टक्के झाली आहे. कारण यावर्षी सभासद संख्या घटली आहे. ही घट ०.६७ टक्के आहे. सभासद संख्या कमी होण्याचे कारण म्हणजे गतवर्षीच्या ७४४ सभासद

संख्येत यावर्षी ९ सभासदांनी वाढ झाली परंतु १४ सभासद, राजीनामा सेवानिवृत्ती व मृत्यु इ. कारणांनी कमी झाले. तसेच यावर्षी १९८७-८८ साली कर्जपुरवठा फक्त १० टक्क्यांनी वाढला परिणामी कायम ठेव कमी प्रमाणात गोळा झाली. तसेच सन १९८८-८९ साली कायम ठेव ६३.६६ टक्क्यानी वाढली आहे.

मुदत बंद ठेव खाते सुरु केलेल्या वर्षी सभासदांकडून अल्पसा प्रतिसाद मिळाला परंतु सन १९८६-८७ साली यामध्ये वाढ होऊन मुदत बंद ठेवी २४०.८६ टक्क्यानी वाढल्या कारण संस्थेने यावर्षी "ब" वर्ग सभासदांकडून मुदती ठेवी स्वीकारण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे सन १९८७-८८ व १९८८-८९ मध्ये अनुक्रमे १७५.८९ टक्के व १६८.८९ टक्क्यानी मुदत बंद ठेवी वाढल्याचे दिसून येतो.

३:४ गुंतवणूक:

पतसंस्था आपल्या सभासदांसाठी अनेक प्रकारची कार्ये करतात. त्यापैकी पैशाची देवाण-घेवाण करणे हे एक आहे. पतसंस्था सभासदांकडून ठेवीद्वारे पैसे जमा करतात व त्यांचा विनियोग गरजूंना कर्ज देण्यासाठी केला जातो. पतसंस्थांना साधनसंपत्तीची गुंतवणूक करीत असताना सुरक्षितता, तरलता व व लाभप्रदता या तत्त्वांचा विचार करावा लागतो.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी पुढील तीन प्रकारे गुंतवणूक करते:---

१) बँक शेअर्स मध्ये, २) रिझर्व फंड ठेवीमध्ये, ३) मुदत बंद ठेवींमध्ये

ही पतसंस्था आपली गुंतवणूक फक्त कोल्हापूर जिल्हा सहकारी बँकेमध्येच करते.

पुढील कोष्टकात पतसंस्थेने केलेल्या गुंतवणूकीतील प्रगतीबाबत माहिती देण्यात आली आहे.

## कोष्टक क्र. ३:३

### एकूण गुंतवणूक (रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष (३०जून) | एकूण गुंतवणूक | एकूण गुंतवणूकीतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | २००.०० | — |
| २) | १९७०-७१ | २००.०० | ०.०० |
| ३) | १९७१-७२ | २००.०० | ०.०० |
| ४) | १९७२-७३ | २००.०० | ०.०० |
| ५) | १९७३-७४ | २००.९० | ०.०० |
| ६) | १९७४-७५ | २००.०० | ०.०० |
| ७) | १९७५-७६ | २००.०० | ०.०० |
| ८) | १९७६-७७ | ६,२००.०० | ३०००.०० |
| ९) | १९७७-७८ | ९,५००.०० | ५३.२३ |
| १०) | १९७८-७९ | १३,७००.०० | ४४.२१ |
| ११) | १९७९-८० | २०,२००.०० | ४७.४४ |
| १२) | १९८०-८१ | २८,७००.०० | ४२.०८ |
| १३) | १९८१-८२ | १,२४,०००.०० | ३३२.०६ |
| १४) | १९८२-८३ | १,५१,७००.०० | २२.३४ |
| १५) | १९८३-८४ | २,३६,२००.०० | ५५.७० |
| १६) | १९८४-८५ | ३,४६,२००.०० | ४६.५७ |
| १७) | १९८५-८६ | ४,९२,२००.०० | ४२.१७ |
| १८) | १९८६-८७ | ६,८७,९००.०० | ३९.७६ |
| १९) | १९८७-८८ | ७,९५,७३०.०० | १५.६७ |
| २०) | १९८८-८९ | ९,३०,२००.०० | १६.९० |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी/सहकारी पतपेढीचे वार्षिक अहवाल. (१९७१-७२ ते १९८८-८९)

कोष्टक क्र. ३:३ वरून असे दिसून येते की, १९६९-७० ते १९७५-७६ पर्यंत पतसंस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत फक्त २०० रुपयांची गुंतवणूक केली आहे. कारण या कालावधीत पतसंस्था आपली ठेव बँकेत चालू खात्यावर जमा करीत होती व संस्थेने बँकेचे सभासदत्व स्वीकारताना २०० रुपये भाग खरेदी केले होते. परंतु १९७६-७७ नंतर पतसंस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मुदत बंद ठेव ठेवण्यास सुरुवात केली व त्यावर्षी ६२०० रुपयाची गुंतवणूक केली. त्यामुळे वार्षिक टक्केवारी ३००० टक्क्यानी वाढल्याचे दिसते.

या पतसंस्थेची सर्वात जास्त गुंतवणूक १९८१-८२ साली (३३२.०६ टक्के) केल्याचे दिसून येते. यावर्षी संस्थेने ८,४०,००० रुपयाचे बँकेकडून कर्ज घेतल्यामुळे संस्थेस १० टक्के प्रमाणे बँक शेअर्स घ्यावे लागले त्यासाठी ८४,००० रुपये व रिझर्व फंड ठेवीमध्ये रु. ५४,२०० गुंतवावे लागल्याने १९८१-८२ साली गुंतवणूक वाढल्याचे दिसून येते. परंतु पुढच्याच वर्षी म्हणजे १९८२-८३ साली गुंतवणूक फक्त २२.३४ टक्क्यानी वाढली आहे. ही वाढ कमी होण्याचे कारण म्हणजे मुदत बंद ठेवी. ६६.२५ टक्क्यानी कमी होणे होय. तसेच बँक कर्जामध्ये ८.१४ टक्क्यानी घट झाली आहे.

१९८१-८२ ते १९८८-८९ या कालावधीत गुंतवणूक ६५०.१६ टक्क्यानी वाढली आहे. याच कालावधीत १९८७-८८ व १९८८-८९ या वर्षी गुंतवणूक फक्त १५.६७ टक्के व १६.९० टक्के वाढली आहे. कारण यावर्षीमध्ये बँक कर्ज घटले आहे. १९८७-८८ साली ३.१ टक्के व १९८८-८९ साली ४.८३ टक्क्यानी बँक कर्जाचे प्रमाण घटले आहे.

१९६९-७० ते १९८८-८९ या वीस वर्षाच्या कालवधीत गुंतवणूकीतील सरासरी वार्षिक वाढ १८७.९३ टक्के झाली आहे.

यावरून असे दिसून येते की, संस्थेने जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतलेल्या १९८१-८२ सालापासून गुंतवणूकीत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

........